# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १०/०७/२०२४ (बुधवार) सायंकाळ

---

### अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

दिनांक ०९/०७/२०२४ रोजी पोलीस ठाणे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत प्रोव्हीशन रेडकामी पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारा विश्वसनीय खबर मिळाली की, ब्राम्हणी गावातील बस स्टॉप जवळ राहणारा आरोपी नामे – मनोहर लक्ष्मण सावरकर वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र. ०२ बसस्टॉप जवळ ब्राम्हणी ता. कळमेश्वर हा त्याचे घरी अवैध्यरीत्या देशी दारू बाळगुन त्याची विक्री करीत आहे. अशी माहिती मिळाल्याने रेड कार्यवाही करून आरोपीच्या घराची घरझडती घेतली असता घरातील मागच्या खोलीत ठेवलेल्या लोखंडी पलंगाच्या गादीखाली सिलबंद देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ चा ०६ प्लास्टीक निपा प्रत्येकी १८० एम एल प्रत्येक निप किंमती ७०रू प्रमाणे असा एकुण किंमती ४२०/– रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे खापरखेडा अंतर्गत दि. ०९/०७/२०२४ चे १६/३० वा. दरम्यान यातील आरोपी हा कुचक मोहल्ला पिपळा डाग बंगला येथे मुखबिराने सांगितले प्रमाणे स्टाफ चे मदतीने दारुबाबत रेड केली असता आरोपी नामे– विकेश उर्फ विकी देविदास चंद्रिकापुरे, वय ३५ वर्ष, रा. कुचक मोहल्ला पिपळा डाग बंगला हा अवैधरीत्या विनापरवाना देशी दारु व मोहाफुल गावठी दारु विक्री करतांना मिळून आल्याने आरोपीचे ताब्यातुन १) देशी दारु भिंगरी संत्रा नं. ०१ ते ४ प्लास्टीक बॉटल प्रत्येकी १८० एम एल प्रत्येकी की. ७० रु. प्रमाणे एकुण २८०/– रु. २) मोहाफुल गावठी दारु एकुण ७ लीटर प्रत्येकी किंमती ५०/– लिटर प्रमाणे एकूण ३५०/– रु. असा एकुण ६३०/– रु. चा मोहाफुल जप्त करुन सदर आरोपी विरुध्द कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

दि. ०९/०७/२०२४ रोजी पोस्टे नरखेड येथील स्टाफ हद्दीत प्रोव्हीशन रेडकामी पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारा विश्वसनीय खबर मिळाली की, वार्ड क्र. ११ येथे राहणारा शंकर गायधने नावाचा इसम हा आपले राहते घरी मोहाफुल गावठी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून स्टाफसह आरोपी नामे– शंकर गणपतराव गायधणे वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र. ७ नरखेड याचे राहते घराची घरझडती घेतली असता त्याचे घराचे हॉलमध्ये १० लिटर मोहाफुल गावठी दारु प्रति लिटर ५० रुपये प्रमाणे अशा एकुण ५०० रु. चा. मुद्देमाल जप्त करुन सदर आरोपी विरुध्द कलम ६५ ई मदाका. प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर